## दृष्टिक्षेपात तालुका

| | | | |
|---|---|---|---|
| • क्षेत्रफळ (चौ.कि.मी) | ९२,६२४ | • गावांची संख्या | ७२ |
| • ग्रामपंचायती | ६४ | • नगरपरिषद | |
| • पोलीस ठाणी | ३ | • महसूल मंडळे | ४३ |
| • जि.प.सर्कल | ७ | • प्रा.आरोग्य केंद्रे | ८ |
| • शाळांची संख्या | २८३ | • महाविद्यालये | ४८ |

## मिरज भुईकोट किल्ला

मिरज येथील भुईकोट किल्ला प्रसिद्ध आहे. जिल्ह्यातील ऐतिहासिक अवशेषांपैकी मिरजेचा भुईकोट किल्ला होय. या प्रांतावर पूर्वी आदिलशहा, मुगल व मराठ्यांनी राज्य केले. अतिप्राचीन काळी शिलाहारी राजांनी राज्य केले. त्यानंतर बहामणी सरदारांनी राज्य केले. १४९० मध्ये विजापूरच्या सुलतानांनी हा प्रांत ताब्यात घेतला. अल अदिलशहा या सरदाराच्या ताब्यातून शिवाजी महाराजांनी हा प्रांत हस्तगत केला व त्यांच्या कारकीर्दित हा किल्ला लढवला गेला. सन १९६० मध्ये छत्रपती शिवाजी महाराज कोल्हापूरास असताना सेनापती नेताजी पालकर यांनी या किल्ल्यास वेढा दिल्याचा उल्लेख आहे. छत्रपती संभाजी महराजांच्या कारकिर्दीत संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव यांनी महाराष्ट्रात औरंगजेबाच्या सैन्याविरूद्ध गनिमी युध्द करताना आपला कबिला सुरक्षित ठिकाण म्हणून या किल्ल्यात ठेवला होता असाही उल्लेख आहे. नंतर विजापूरच्या मुघलांनी परत या प्रांतावर ताबा मिळविला. १७३९ मध्ये कोल्हापूरच्या शाहू महाराजांनी या किल्ल्यावर ताबा मिळविला. १७६१ मध्ये माधवराव पेशवे यांनी हा प्रांत पटवर्धन घराण्याकडे सुपूर्द केला. हा किल्ला नेमका कोणी बांधला याचा उल्लेख आढळत नाही. १४८३ मध्ये या किल्ल्याची डागडुजी झाल्याचा उल्लेख आढळतो. सध्या त्या ठिकाणी नवीन वसाहत झाली आहे.

## मिरज हॉस्पिटल

मिरज हे वैद्यकीयदृष्ट्या जगप्रसिद्ध शहर आहे. सर विल्यम वानलेस हॉस्पिटल हे सन १८९४ मध्ये सर विल्यम यांनी स्थापन केले. मशिनरींच्या साहाय्याने या हॉस्पिटलमध्ये रुग्णांची सेवा केली जाते.

Scanned by CamScanner

## तंतुवाद्ये

दिडशे वर्षापूर्वीपासून मिरजेतील तंतुवाद्य विश्वविख्यात आहे. मिरज येथे १८५० मध्ये पहिल्या तंतुवाद्याचा जन्म झाला. महाराष्ट्रातील पहिल्या तंतुवाद्याचे निर्माते फरीदसाहेब शिकलगार व मोहिद्दीनसाहेब शिकलगार होते.

मिरजेत सुमारे पाचशे सतारमेकर कारागीर या व्यवसायात काम करीत आहेत. मिरजेत निर्मिती होणाऱ्या तंतुवाद्यांना इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी सारख्या पाश्चिमात्य देशातून मागणी आहे. पंडित भीमसेन जोशी, पंडित हृदयनाथ मंगेशकर, शुभा मुदगल यांच्यासह शास्त्रीय संगीतातील दिग्गज मंडळी मिरजेतील तंतुवाद्यांचा वापर करतात.

## ख्वाजा मिरासाहेब अवलिया दर्गा

हा दर्गा ५०० वर्षे जुना आहे. सर्व धर्मातील व पंथातील लोक येथे दर्शनास येतात.

## तुंगचे हनुमान मंदिर

सांगलीपासून १२ किमी अंतरावर तुंग हे गाव वसलेले आहे. मारुतीचे तुंग अशी साडेतीनशे वर्षापासून गावाची ख्याती आहे. आकाशवाणी प्रक्षेपण केंद्र, प्रादेशिक नळपाणीपुरवठा योजना व ढबू मिरची यामुळे गावाची ओळख आहे. अलीकडे या गावाची ओळख स्वच्छता अभियानामुळे राज्यभर झाली आहे.

गावाच्या मध्यभागी हनुमान मंदीर आहे. १८९५ मध्ये श्री वासुदेव मेहेंदळे यांनी हनुमान जन्मोत्सवास सुरूवात केली. श्रीची मूर्ती उत्कृष्ट कोरीव आहे. श्रीच्या पाठीमागे चांदीची प्रभावळ आहे. दोन मजली गाभारा आहे. लाकडी छत व बाहेर दीपमाळ आहे. सभामंडपाच्या बाजूला संगमरवरी दत्तमूर्ती आहे. शनिवारी, अमावश्या, पौर्णिमेला भक्तांची गर्दी होते. चैत्रशुद्ध अष्टमीपासून हनुमान जयंतीपर्यंत मोठा जन्मोत्सव होतो. सात दिवस अखंड हरीनाम सप्ताह, भजन, किर्तन, प्रवचन, भारुडे होतात.

हनुमान जन्मकाळाला येथे मोठी यात्रा भरते. यादिवशी पहाटे पंचामृत पूजा होते. सुर्योदय होताच श्री हनुमानाच्या पाळण्यावर पुष्पवृष्टी होते. रणशिंगाच्या, टाळमृदंगाच्या गजरात सुवासिणी पाळणा गातात. दुपारी खिरीचा प्रसाद होतो. रात्री हनुमानाची पालखी निघते. ओव्या, भजन, भारुडे म्हणत सूर्योदयावेळी पालखी कृष्णा नदीकडे नेतात. श्रीला स्नान घालून परत मंदिरात आल्यानंतर उत्सवाची सांगता होते.

Scanned by CamScanner

# काळू - बाळू

लहू संभाजी खाडे (काळू) - जन्म १९३२ - मृत्यू - २०११

अंकुश संभाजी खाडे (बाळू)- ३२ - मृत्यू - २०१४

मूळ गाव - कवलापूर ता. मिरज

शिक्षण - अत्यल्प

विविध लोककलाचे माहेरघर असलेल्या कवलापूरला तमाशाची दोनशे वर्षांची परंपरा आहे.

'काळूबाळू' ही 'जहरीप्याला' या वगनाट्यातील पात्रांची नावे ही जुळी भावंडे दिसायला सारखीच होती.

१९५३ रोजी 'जहरी प्याला' वगनाट्य सुरू केलं. गिनीज बुकने नोंद घ्यावी, असे बारा हजार प्रयोग झाले. लोकांना मनसोक्त हसवायचे, हजरजबाबी विनोद करायचे. महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश व दिल्लीतही 'जहरी प्याला' गाजले. गावाला विजयादशमी ते अक्षयतृतीयेपर्यंत सात महिन्यात २१० कार्यक्रम व्हायचे ५२ वर्षे रंगमंचावर वास्तव्य केलं. शाळांची बांधकामे, वसतीगृहे, मूक बधिर मुलांच्या शाळांसाठी २५ ते ३० कार्यक्रम वर्षभरात करायचे व देणगी देत.

* १२ मे १९९५ - पहिला मोरोपंत पिंगळे पुरस्कार.
* १९९६ - महाराष्ट्र राज्य पुरस्कार
* १९९८ - नाट्यगौरव पुरस्कार
  - राष्ट्रीय नाट्य अकादमी पुरस्कार
* शंभरहून अधिक पुरस्कार
* २५ ते ३० प्रमुख वग केले.
* ध्वनीफितीही महाराष्ट्र, भारत, इंग्लंड, अमेरिकेत गेल्या.

Scanned by CamScanner

## प्रमुख गोष्टी

| | | | |
|---|---|---|---|
| ● नद्या | १ | ● ओढे | १३ |
| ● बाजारपेठा | १० | ● जनावर बाजार | १ |
| ● मुख्य बाजारपेठा | २ | | |

## जमीन

| | |
|---|---|
| ● एकूण क्षेत्रफळ | ९२,५२० हेक्टर |
| ● लागवडीखालील क्षेत्र | ३३, १४१ |
| ● बागायत क्षेत्र | २०,९४४ हेक्टर |
| ● कोरडवाहू क्षेत्र | ५९,५०० हेक्टर |
| ● डोंगराळ क्षेत्र | निरंक |
| ● पडीक क्षेत्र | ३३९२ हेक्टर |
| ● वन क्षेत्र | १०९७ हेक्टर |

## पर्यटन

| | | | |
|---|---|---|---|
| ● एकूण मंदिरे | २६६ | ● स्मारके | ७ |
| ● किल्ले | नाही | ● डोंगर | १ |

## मिरज तालुका इतर वैशिष्ट्ये

- सांगली येथील श्रीगणेश मंदीर व कृष्णाकाठी कै.वसंतरावदादांची समाधी
- सांगली येथील आयर्विन पुल व गणेशदुर्ग
- हरीपूर येथील कृष्णा व वारणा नद्यांचा संगम व श्रीसंगमेश्वर देवालय, बागेतील गणपती
- तुंग येथील समर्थ रामदासस्वामींनी स्थापन केलेले श्री मारूती मंदीर
- मिरज येथील रेल्वे जंक्शन, ख्वाँजा शमशुद्दीन मिरासाहब दर्गा
- भोसेजवळ दंडोबा डोंगरावरील दंडेश्वर मंदीर व अभयारण्य
- बेळंकीजवळ श्री सिद्धेश्वर मंदीर
- क्रांतीवीर दत्ताजीराव पाटील जन्मस्थळ - सोनी

Scanned by CamScanner